(71)

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/विधी/४२१/२०१९/२० दिनांक : २३/११/१९

प्रति,

मा. सदस्य सचिव
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष**

**विषय :-** राज्यस्तरीय कांदळवन संवर्धन व संरक्षण समितीच्या दि. 20/9/2019 रोजी झालेल्या बैठकीतील सुचनेनुसार केलेल्या पुर्ततेबाबतचा अहवाल.

**संदर्भ :-** 1) दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या आठव्या बैठकीचे इतिवृत्तांत
2) आपलेकडील पत्र ऑक्टो 2019, जाक्र.ल.ले/71/2019-20

**मा. महोदया,**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कांदळवनाच्या क्षेत्रात झालेल्या अतिक्रमणाबाबत तसेच मातीभरावाबाबत तक्रारदार श्री. धिरज परब व इतर यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे विविध तक्रारी अर्ज दाखल केले आहेत.

सदर तक्रारीच्या अनुशंगाने मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची आठवी बैठक घेण्यात आली होती. तसेच श्री. धिरज परब यांनी केलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील तक्रारीनुसार तहसिलदार, ठाणे यांचेमार्फत दि. 08/02/2019 व दि. 08/03/2019 रोजी कांदळवन उपसमितीच्या सदस्यांनी केलेल्या स्थळपाहाणी अहवालानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करणेकरीता संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये निर्देश देऊन व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेस विनंती केलेली आहे. तरी तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुशंगाने महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची तक्रारनिहाय माहिती सोबत जोडून देत आहे.

आपला,

(स्वाक्षरी) 13/11/19

**बालाजी खतगावकर**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**तक्रार क्र. 71 :-** श्री. धिरज परब यांच्या दि.02/05/2019 रोजीच्या तक्रारी अन्वये भाईंदर पश्चिम बोस मैदान समोर कांदळवन ऱ्हास प्रकरणी गुन्हा दाखल असताना त्या भागात MMRDA कडून कांदळवन, पाणथळ, सी.आर.झेड मध्ये सर्रास बेकायदा खोदकाम व रस्ता काम करून पर्यावरणाचा ऱ्हास MMRDA यांना पत्र देणे.

**महानगरपालिकेमार्फत केलेल्या कार्यवाहीची माहिती** :- सदर ठिकाणी महानगपालिकेच्या नियोजित विकास योजनेमध्ये 30 मी. रुंद आरक्षित करण्यात आलेला आहे. सदर डी. पी. रस्ता विकसित करणेसाठी परवानगी मिळणेकरीता मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. 87/2006 मध्ये Notice of Motion क्र. 478 ते 482/2013 दाखल केले असता दि. 04/09/2014 रोजीच्या आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाने सदर रस्ता विकसित करणेकरीता परवानगी दिलेली आहे. सदर परवानगीच्या अनुशंगाने सदर कामास S.E.I.A.A. यांची दि. 21/03/2017 अन्वये मान्यता प्राप्त करून घेतल्यानंतर सदर ठिकाणी मुंबई महानगर प्रादेशिक विकास मंडळ (M.M.R.D.A.) मार्फत रस्ता विकसित करण्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी कोणतेही मातीभराव करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे रस्त्यासाठी सदरयस्थितीमध्ये कोणतेही कांदळवन तोडण्यात आलेले नाही. सदर कामामधुन निघालेले डेब्रिज हटवण्यासाठी संबधित ठेकेदारास आदेश देण्याकरीता मुंबई प्रादेशिक विकास मंडळ यांना कळविण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या 30 मी. रुंद DP रस्त्यापलीकडील जागा ही Salt (मिठागर) विभागाची असून सदर जागेवर कांदळवनाची लागवड करण्यास परवानगी मिळण्याबाबत Salt विभागाला कळविण्यात आले आहे. परंतु सदर कांदळवन लागवड करण्यापुर्वी मनपा क्षेत्रातील कांदळवन क्षेत्राचे सर्वेक्षण होऊन कांदळवन क्षेत्राची हद्द कायम करणे आवश्यक आहे. जेणेकरून कांदळवन क्षेत्राचे संरक्षण व 50 मी. बफर झोनच्या हद्दीचे अनुपालन करणे सोईचे जाईल.

बालाजी खतगावकर
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका